पुढारी

# 'सायबर'मध्ये स्कील हबचे उद्घाटन

## डॉ. योगेश जाधव, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सायबर महाविद्यालयात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) योजनेंतर्गत इंटरप्रेनरशिप डेव्हलपमेंट सेल व स्कील हबचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते डिजिटल ई-लाँचिंगने झाले.

'रुसा' योजनेंतर्गत देशभरातील अनुदानप्राप्त सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये डिजिटल ई-लाँचिंगचा कार्यक्रम रविवारी दुपारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जम्मू-काश्मीर येथून एकाचवेळी झाला. शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित पाच महाविद्यालये ही 'रुसा' योजनेस पात्र ठरली असून त्यांना भरीव निधी मिळाला आहे. सायबर महाविद्यालयास पाच कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. सायबर महाविद्यालयात रविवारी योजनेच्या कोनशिलेचे अनावरण उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष, दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, आ. अमल महाडिक यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

यावेळी तेलंगणा, आसाम, हरियाणा, ओडिशा, गुजरातमधील



कोल्हापूर : सायबर महाविद्यालयात 'रुसा' योजनेंतर्गत इंटरप्रेनरशिप डेव्हलपमेंट सेल व स्कील हब कोनशिला अनावरणप्रसंगी उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष, दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. आ. अमल महाडिक, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. ए. शिंदे, डॉ. डी. आर. मोरे, एस. जी. कुलकर्णी. (छाया : पप्पू अत्तार)

विद्यार्थ्यांनी शिक्षण व्यवस्थेबद्दल संतुष्ट आहात का?, डिजिटल इंडियामुळे झालेला बदल, देशातील नागरिक गरिबीमुक्त कसे होणार?, अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या जाहीर केलेल्या योजनांसाठी पैशांची तरतूद कशी करणार? आदी प्रश्न विचारले. त्यास पंतप्रधान मोदी यांनी सविस्तर उत्तरे दिली. 'ईडी' सेलच्या प्रमुख डॉ. विशाखा आपटे यांनी 'रुसा' योजनेची माहिती दिली. डॉ. भक्ती बत्रा यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, प्रतिभा दीक्षित, एस. जी. कुलकर्णी, संस्थेचे अध्यक्ष ॲड. एस. डी. शिंदे, सचिव डॉ. आर. ए. शिंदे, विश्वस्त डॉ. व्ही. एम. हिलगे, संचालक डॉ. एम. एम. अली, 'रुसा' समन्वयक डॉ. सी. एस. दळवी, प्रशासकीय अधिकारी विनायक साळोखे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 FEB 2019
सकाळ

# सायबर महाविद्यालयात 'ईडी सेल'

## देशभरातील ईडी सेलचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

कोल्हापूर, ता. ३ : केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उच्चतर अभियानांतर्गत देशातील निवडक महाविद्यालयांत इंटरप्रिटअरनशिप डेव्हलपमेंट सेल व स्कील हब (ईडी सेल) सुरू करण्यात आले आहेत. येथील छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अॅण्ड रिसर्च (सायबर) संस्थेतही ईडी सेलला मान्यता मिळाली. केंद्र सरकारने पाच कोटींचे अनुदान दिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रीनगर येथून आज व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे देशभरातील ईडी सेलचे उद्घाटन केले. सायबर महाविद्यालयाच्या सभागृहात कार्यक्रम झाला.


राष्ट्रीय उच्चतर अभियान (रुसा) या उपक्रमासाठी केंद्र सरकारने ३३ हजार कोटींचा निधी दिला आहे. विविध पातळ्यांवर परीक्षण करून देशातील नामांकित संस्थांत ईडी सेलची स्थापना करण्यात आली. आज सायबर महाविद्यालयात डॉ. ए. डी. शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध उपक्रम झाले.

माजी आमदार अॅड. श्रीपतराव शिंदे, व्यवस्थापकीय विश्वस्त व सचिव डॉ. रणजित शिंदे यांच्या उपस्थितीत ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन झाले. ईडी सेलच्या प्रमुख डॉ. विशाखा आपटे यांनी सेलच्या कामाची माहिती सांगितली.

त्या म्हणाल्या, की व्यवसाय व्यवस्थापन शाखेचे विद्यार्थी, उद्योजक तसेच उद्योग करू इच्छिणाऱ्यांसाठी या सेलची मदत होणार आहे. उद्योगाचा आराखडा बनविण्यापासून ते उत्पादन बाजारात येईपर्यंत सर्व गोष्टींची माहिती त्यांना येथे मिळेल.या वेळी आमदार अमल महाडिक, कुलगुरू देवानंद शिंदे, प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. एस. जी. कुलकर्णी, संस्थेचे विश्वस्त डॉ. आर. ए. शिंदे, डॉ. व्ही. एम. हिलगे, डॉ. एम. एम. अली उपस्थित होते.

### पंतप्रधानांनी दिली समर्पक उत्तरे

दुपारी चारच्या सुमारास 'ईडी सेल' उद्घाटनाचा समारंभ झाला. यात पंतप्रधान मोदी यांनी श्रीनगर येथून व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून सर्व देशातील विद्यार्थ्यांना संबोधित केले. विविध राज्यांतील विद्यार्थ्यांनी मोदी यांना पर्यटन, शेती, उद्योग, स्वच्छता, डिजिटल इंडिया याबाबत प्रश्न विचारले. मोदी यांनी सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. देशातील सर्व नागरिकांनी संकल्प केला तर लवकरच भारत हा जगातील सर्वांत शक्तिशाली देश असेल, असे त्यांनी सांगितले.



कोल्हापूर : राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियान (रुसा) अंतर्गत सायबर महाविद्यालयातील ईडी सेलचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे रविवारी केले. या वेळी उपस्थित सायबरमधील विद्यार्थी आणि प्राध्यापक.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 FEB 2019
तरुण भारत

# संगणकीय हिंदी भाषा विकसित करण्यावर भर

## ऑक्सफर्ड विद्यापीठाचे प्रा. इम्रे बंग्घा यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

यूरोपमध्ये भारतीय भाषांमधील विविध कामांमध्ये सुलभता येण्यासाठी संगणकिय हिंदी भाषा विकसित करण्यावर भर देणार आहे, असे प्रतिपादन इंग्लंडमधील ऑक्सफोर्ड विद्यापीठातील डॉ. इम्रे बंग्घा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागात डॉ. इम्रे बंग्घा यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. हिन्दी विभागाच्या प्रमुख डॉ.पद्मा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. इम्रे बंग्घा हे मूळ हंगेरियन असून त्यांनी हंगेरियन भाषा व साहित्यातील एम.ए. बरोबरच तेथील विद्यापीठाच्या नियमानुसार दुसरी भाषा हिंदी निवडली व हिंदी विषयातून एम.ए.ची पदवीप्राप्त केली आहे. योगाभ्यासाच्या आवडीमुळे त्यांची भारताबाबतची जिज्ञासा वाढली व त्यांनी रीतीकालीन हिंदी कवी आनंदघन यांचेवर संशोधन करून पीएच.डी.ची पदवी प्राप्त केली. ऑक्सफोर्ड विद्यापीठ, इंग्लंड येथे हिन्दी भाषा व साहित्याबरोबरच डॉ. इम्रे बंग्घा उर्दू भाषेचे अध्यापन करीत आहेत. इतकेच नाही तर मराठी, गुजराती, बंगाली या भारतीय भाषांचाही त्यांनी अभ्यास केला आहे. हिन्दी विभाग व विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, हायस्कूल शिक्षक, यांच्याशी संवाद साधला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठातील डॉ. इम्रे बंग्घा यांचे स्वागत करताना हिंदी विभागप्रमुख डॉ. पद्मा पाटील.**